## महाराष्ट्र शासन

पत्र क्र. पंराज २०११/प्र.क्र.९८/पंरा २
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २० जानेवारी, २०१२

प्रति

विभागीय आयुक्त (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)

**विषय :-जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या सदस्याकडे शौचालय सुविधा असण्याबाबत.**
**संदर्भ** :- शा. प. क्र. पंराज २०११/प्र.क्र.९८/पंरा २, दि. १३/१/२०१२

वरील संदर्भीय **पत्र दि. १३.१.२०१२ रद्द** करण्यात येत आहे व खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद कायद्याचे **कलम १६ (१)** जिल्हा परिषद कौन्सिलर, म्हणून **निवडून येण्यास** अथवा **कौन्सिलर म्हणून राहण्यासाठी** ज्या अनेक **अनर्हता (Disqualifications)** आहेत त्याबाबत आहे.

**कौन्सिलर म्हणून कार्यरत असणाऱ्या व्यक्तीला** सदर कलम 16 (1) (o) च्या पहिल्या परंतुकेनुसार त्यांचेकडे शौचालय असल्याबाबतचे संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसभेच्या ठरावासहित प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सादर करावयाचे आहे. हीच तरतूद **विद्यमान** पंचायत समितीच्या सदस्यांनाही लागू आहे.

मात्र **इच्छुक उमेदवाराने ग्रामसभेच्या ठरावासहित ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र नामनिर्देशनपत्रासोबत जोडण्याची तरतूद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती कायद्यांतर्गत केलेल्या निवडणूक नियमात नाही.**

निवडणूक प्राधिकरण इच्छुक उमेदवाराकडून कलम १६ (१) मधील इतर अनर्हतेबाबत ज्याप्रमाणे शहानिशा प्रक्रिया विहीत करु शकते त्याप्रमाणे याही अनर्हतेबाबत न्यायोचित निदेश देण्यास सक्षम आहे.

**(सुधीर ठाकरे)**
**सचिव (ग्रा. वि. व पं. रा.)**

**प्रत माहितीस्तव :-**

१. महासंचालक, महिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त सूचनांना प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

२. उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०००३२.